# नव्वदोत्तरी बालकादंबऱ्याच्या आशयाचे स्वरूप

**विजया पांडुरंग पाटील,**पी.एच.डी.संशोधक, विद्यार्थीनी,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

..........................................................................................................

**प्रास्ताविक -**

समाजजीवनातील बाल्यावस्थेकडे पाहत असताना असे जाणवते की, एका विशिष्ट वयात मुलांच्या साहित्य अभिरूचीचा अंकुर फोफावू लागतो. वास्तवाचे भान येउ लागल्याने त्याच्या सभोवतालच्या परिसरातील घडणाऱ्या बदलांचे तो अनुकरण करण्याचा तो प्रयत्न करतो. निसर्गामध्ये असणारी मानवेत्तर सजीवांची सृष्टी, जगण्यांविषयी माहिती ज्ञात करून देताना त्यांचे कुतूहल शमविणे व ऋतुमानानुसार होणारे बदल त्यांच्या दृष्टीक्षेपात आणणे हे उद्दिष्ट कलाकृतीमागे असते. नव्वदोत्तरी बालकादंबऱ्याचा मागोवा घेत असताना मुलांच्या मनातील अनेक प्रश्न, अशा अनेक प्रश्नांतून त्याला स्वत:ला वेगळ करून पाहण्याची, विविधांगी कौशल्ये अनुभवण्याची मुलांची मानसिकता, एखादया ठिकाणावरून विशिष्ट मनोवस्थेमध्ये बालकाने कोणती भूमिका बजवावी या करिता ठराविक दिशादर्शक ठरू शकतील असे विषय त्यांच्यासमोर ठेवणे, त्यासाठी त्याला कृतीप्रवण करणे हाच उद्देश साहित्यनिर्मितीमागे असावा असे वाटते.

**उत्सुकता ताणून धरणारी बालमने**

दिलीप प्रभावळकरांनी 'बोक्या सातबंडे' भाग १ ते १० या बालकादंबरी मालिकेतून बोक्याच्या माध्यमातून कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक स्तरामध्ये वावरणाऱ्या बालकांकडे लक्ष वेधले आहे. प्रभावळकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. मराठी रंगभूमी, दूरचित्रवाणीवरील मालिका, मराठी, हिंदी चित्रपटामध्ये त्यांनी वेगवेगळया भूमिका केल्या आहेत. नायक आणि खलनायक या भूमिका त्यांनी तेवढयाच ताकदीने निभावलेल्या दिसतात. साहित्याच्या क्षेत्रात आपला अमीट ठसा उमटवून वाचकांना जाणीव जागृती करून दिली आहे. आज समाजव्यवस्थेमध्ये अनेक प्रश्न आवासून उभे आहेत.नोकरी आणि इतर कौंटुबिक जबाबदारीमध्ये व्यस्त असल्याने किती तरी प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसते त्यावर बालसुलभ वृत्तीमधून प्रश्नांचा हल करण्याची भूमिका बालक आपल्यासमोर मांडतो. यांचे ज्वलंत उदाहरण 'बोक्या प्राणी पाळतो' या प्रसंगातून बोक्याची इतरांना मत पटवून देण्याची वृत्ती बोक्याच्या अनेक कृती फक्त रंजक न ठरता समाजाभिमूख बनवतात. मोठया भावाच्या प्रेम प्रकरणात लहान भावाने घातलेले लक्ष किती डोईजड होऊ शकते याचे प्रत्यंतर दादाचे प्रेमप्रकरणामध्ये अनुभवयास येते. 'गुप्त खजिन्याचा शोध' गुप्त धन शोधण्यासाठी खोदलेला खड्डा जबरदस्तीने हुंडा देऊन ठरविलेले लग्न मोडते. त्यामुळे संबधित तरूणीने शुभेच्छा देऊन आभार मानते. सतत काहीतरी करण्याच्या बोक्याच्या करामती इतरांच्या फायदयाच्या ठरतात. गरीब विद्यार्थी फंडाला मदत करण्यासाठी शेजाऱ्यांच्या कुत्रा लपवून पैसे काढण्याच्या कृतीतून विनोदीवृत्तीचे दर्शन घडते. प्रौढ आणि समंजस व्यक्तिमत्वांना ही बालके आपल्या उद्योगांनी, खोडकरपणाने विचारप्रवृत्त करतात. त्यांच्या बालीश करामतीमूळे सर्वजण आनंदीत होतात. कुणाला तरी त्रास देऊन आनंद मिळवणे असे कृत्य तो कधीच करत नाही. याचे प्रांजळ निवेदन कथानकाच्या ओघात दिसून येते. सरांच्या प्रत्येक कृतीपाठीमागे काही तरी कारण असावे म्हणून मानसशास्त्रीय दृष्टीकोणातून उपाययोजना करणे. आजारी असूनही शिक्षकांच्या सेवानिवृत्तीला भाषण करून शिक्षकांविषयी आदराची कृतज्ञता व्यक्त करणे असे अनेक प्रसंग बोक्याचे नटखट सेवाभावी वृत्तीची साक्ष देतात्. बोक्याला सकाळी उठवण्यापासून शाळेत जाईपर्यंत सर्वजण मदत करतात. त्यातून काही मनोरंजक किस्सेही पहावयास मिळतात. दादाच्या नाटकात ऐनवेळी साधूची भूमिका बाबांना करायला सांगून दादाला मदत करणे. आजीची पंच्याहत्तरी साजरी

करताना तिला आवडणाऱ्या अनेक गोष्टी करणे इ. बाबी. आज समाजातील वृद्धांचे जीवनवास्तव पाहता त्यामूळे बोक्या वृद्धांची एकमेंकांच्या घरी काही दिवसांसाठी बदली या कृतीमुळे सामाजिक बांधिलकी एकत्र कुटुंबपद्धतीचा ध्यास हया साऱ्या बाबींचा मुर्तिमंत आदर्शभावी पिढीसमोर ठेवतो. गावी गेलेल्या आईला पत्र लिहण्यातली खोचकतेतून अललड व्यक्तिमत्त्वाचे घडवलेले दर्शन, वृद्ध शिक्षकांचे आदरातिथ्य करणे. आई बाबा आर्थिक विवंचनेत आहेत असे समजून बालसंगोपणाद्वारे आर्थिक कमाई करण्याचा प्रयत्न विचारणशील आहे. अनेक प्रसंगाद्वारे लक्षात येते की, बोक्या हा सातत्याने प्रत्येक गोष्टीचा बारकाईने अभ्यास करणारा आहे. न्यायाच्या, सत्याच्या दिशेने वळणारे त्याचे व्यक्तिमत्व आहे. वयाने लहान असल्याने त्याला फरक कळत नसला तरी चांगले आणि वाईट हे समजण्याइतपत त्याच्याकडे बुद्धि आहे. चुकिचे घडत असताना तो कुणाचीही पर्वा न करता आपले काम चालूच ठेवतो. तो त्याच्या बालबुद्धिला पटेलं असे पर्याय शोधत राहतो. त्याचे ही वेगवेगळी रूपे आपल्या मनात घर करून राहतात. प्रत्येक मुले हे वेगळं आहे त्याच्या आकलन शक्तीला वेग दिल्यास असे व्यक्तिमत्वाची समाजात उणीव भासणार नाही. असेच सूत्र जणू ही प्रभावळकरांची कादंबरीमालिका मांडून जाते.

**ग्रामजीवनाचे दर्शन.**

मदन हजेरी यांची लेखणी कोकण ग्रामजीवनाच्या पार्श्वभूमीवरील बालविश्वात रमणारी आहे. उपेक्षित आणि दैनंदिन जीवनातील प्रश्नांनी ग्रासलेल्या बालकांचे प्रश्न मांडताना दिसतात. 'गजरे विकणारी मुलगी' मध्ये बालनायिका भिकीचा आडवळणीच्या वाटावरून शिक्षणासाठी चाललेला खडतर प्रवास दिसतो. आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने फुलांचे गजरे करून विकणे. पहाटे उठून जंगलातून लाकूड आणून मोळी विकणे, घरकाम करणे, कष्टप्रद जीवन जगण्याचा अव्याहत प्रयत्न दिसतो. 'काळी मनी' तून व्रात्य बालकाला मायेने, ममत्वाने जोजावले तर त्याच्या बालसुलभ वृत्तीत सकारात्म बदल घडू शकतो. हे मदन हजेरीनी व्यक्तिपरत्वे मानवी स्वभावगुण वैशिष्टयांचे चिंतन केले आहे. यामध्ये निसर्ग, शेतीवाडी, मोर, प्राणी, फुलबागेची आवड, दुभती जनावरे असे सर्व घटक यामध्ये येतात. 'लहानू' या बालकादंबरीत पोरक्या मुलाने दु:खद जीवनावर मात करत, कष्टाने शिक्षण घेणाऱ्या, मुलांचे जीवन रेखाटले आहे. कष्ट करूनही अपमानास्पद वागणूक मिळते. पण त्याचा फारसा विचार न करता परोपकारी वृत्तीने इतरांना मदत करतो. 'पावा पुन्हा वाजला' मधून अनाथ मुलांचे जीवन चित्रित करताना कानाने बहिरा असणारा मुलगा गावकाऱ्यांची किरकोळ कामे, देवळातील देवपूजा सारखी कामे करून, जीवन कंठतो. बहीण लाली समवेत कष्ट करून जीवन जगतो व इतरांनाही मदत करतो. 'प्रिय पंतप्रधान' ही बालकादंबरी अनाथ मुलाची झालेली परवड व्यक्त करणारी हाल अपेष्टांचे जीवन चित्रण करणारी आहे. वडिलांच्या मृत्यूनंतर आई आणि मुलगा यांची झालेली ससेहोलपट त्यावर काढलेला मार्ग, चांगूलपणाचा फायदा घेऊन लहान मुलांना बेकायदेशीर कामे लावून पैसे कमवणारी माणसे यांच्या वृत्तीप्रवृत्तीचे दर्शन घडविणारी आहे.

**कष्टकरी मुलांच्या जीवनाचे दर्शन**

बाबा भांड यांनी 'खरी कमाई' तून श्रमाचे महत्व स्पष्ट केले आहे. प्रतिकुल परिस्थितीमध्ये व्यक्तिमत्वाला असलेली सचोटीची उंची 'धर्मा' या बालनायकाच्या माध्यमातून बालवाचकांच्या मनावर ठसा उमटविते. ग्रामीण भागातील मुलांचे प्रश्न शिक्षणाची आस, गरिबीवर मात करण्याचे धैर्य, शिक्षक, विद्यार्थी संबंध, एकमेकांना समजून घेणारे स्वभावविशेष असे व्यक्तिमत्वाचे पैलू इथे पहावयास मिळते. 'गोष्ट एका चपलेची' कौटुंबिक स्थितीवर भाष्य करणारी ही कादंबरी आहे. आजी व आई यांनी घेऊन दिलेल्या चपला म्हणजेच धर्माच्या जिव्हाळयाचा विषय ठरतो. ही बालकादंबरी वास्तवदर्शी आहे. तशी ती उत्कंठावर्धक ही आहे. 'दशक्रिया' या बालकादंबरीत

उपेक्षित समाजातील मुलांचे जगणे चित्रित केले आहे. विविध वयोगटातील ही बालके या बालकादंबरीमध्ये प्रेताच्या राखेतील मिळणाऱ्या पैशातून आर्थिक आधार शोधतात. वयाने लहान असूनही पैसे कमावण्यासाठी घाटावर क्रियाकर्म करण्यासाठी येणाऱ्या लोकांची वाट बघतात. एखादे दिवशी प्रेत किंवा क्रियाकर्म करण्यासाठी कोणी आले नाही तर ही मुले चितांक्रांत होतात. एखाद्याच मरण तर दुसऱ्यांचे जगणं येथे सुखदु:ख याची पर्वा नाही. एकावर दुसरा पुर्णपणे अवलंबून आहे. येथे पोट भरणे महत्त्वाचे आहे.

**प्राणीजीवन विशेष**

अनेकविध आशयसंपन्न अर्थबोध करणारी मौलिक साहित्यसंपदा, पारंपारिक बालकथानकापेक्षा त्याचे स्वरूप वेगळे आहे. विचार करायला लावणारे आहे. शाहीर हेगडेंच्या कादंबरी, कथांमध्ये मानव आणि मानवेत्तर प्राणीसृष्टीचे जीवनाविशेष व्यक्त करताना व्यक्तिगत भावजीवनापासून सामाजिक वास्तवापर्यंतचे व्यापक अनुभवविश्व सामावले आहे. बालकांच्या भावविश्वाशी एकरूप होणारी समरसता, नाविन्यता, कल्पनाशक्ती यांच्यातून ते वृत्तीविशेष प्रकट करतात. 'पाचूचे बेट' या बालकांदबरीत मानवेत्तर पशूपक्ष्यांचे भावविश्व रेखाटत असतान 'सर्वधर्मसमभावाचे' बीज रूजवण्याचा केलेला प्रयत्न स्त्यूत वाटतो. एकीचे महत्व, पृथ्वीतलावरील प्रत्येक जीवजंतूचे असणारे महत्व, निसर्गाने, परमेश्वराने दिलेल्या वस्तूचा उपभोग न्यायाने घ्यावे हे सूचित होते. 'तूफान' ही बालकादंबरी स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी आहे. हत्तींचे जीवन साकार करणारी आहे. वन्यजीवनावर आधारित कादंबरीतून नेतृत्वगुण कुशलता, मादीने नेतृत्वाला दिलेले प्राधान्य, कळपाने जात असताना ठरलेल्या क्रमांने जाणे. चारा,पाणीचा शोध घेऊन केलेले मार्गक्रमण, वृद्ध झाल्यानंतर कळप अडचणीत येऊ नये म्हणून वार्धक्याने झुकलेला हत्ती कळपाला निरोप देऊन होतकरू हत्तींचा काळजी घेण्यास सांगतो. बालवाचकांना वेगळया वळणाची, धाटणीची विषय देऊन मानवेत्तर सृष्टीचा परिमळ व्यक्त केला आहे.

**समारोप**

नव्वदोत्तरी नंतरचे बालकादंबरी लेखन पूर्वीच्या तुलनेत फार वेगळे असल्याचे जाणवते. कालोघाप्रमाणे समाजामध्ये होत असणाऱ्या स्थिंतरांचा आढावा घेताना माध्यम संस्कृतीने जनजीवनावर विशेष भर टाकलेली दिसते. अवतीभवती घडणाऱ्या सुष्टदृष्टांचा वेध घेताना बालमंजूर, अनाथमुलांचे प्रश्न, गुन्हेगारीकडे वळणारी दृष्टप्रवृत्ती, गरीब परिस्थितीतून शिक्षण घेणारी मुले, विवाहितांच्या समस्या आणि त्यांच्या मुलांचे प्रश्न, प्राण्याबद्दल असणारा दयाभाव असे अनेकविध प्रश्नांनी ग्रासले असताना विषयांचा विविधता दिसते.

संदर्भ सूची

१. मराठी बालसाहित्य : विचार आणि दर्शन, डॉ. लीला दीक्षित.
२. बालसाहित्य बालारीक्षण : विविध आयाम, संपा. मंदा खांडगे आणि लीला दीक्षित.
३. बालसाहित्याची रूपरेखा : मालतीबाई दांडेकर.